अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । शनिवार
०३.१०.२०२६

वरुड
# दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २४४ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

# फार्मा कंपनीत मोठी दुर्घटना!

## बॉयलरच्या स्फोटात ५ जणांचा मृत्यू

### १० गंभीर जखमी : बचावकार्य सुरु

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***तिरुपती*** – आंध्र प्रदेशातील तिरुपती येथे शनिवारी (दि.०३) सकाळी भीषण दुर्घटना घडली. श्री सिटीमधील एका औषध निर्मिती कंपनीत बॉयलरचा स्फोट झाला. या दुर्घटनेत आतापर्यंत ५ जणांचा मृत्यू झाला असून, १० जण गंभीर जखमी झाले आहेत.

स्फोटाची तीव्रता इतकी होती की कंपनीच्या परिसराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, सर्वत्र ढिगारा पसरला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि आपत्कालीन पथके घटनास्थळी दाखल झाली. जखमींना बाहेर काढून जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, मदत आणि बचावकार्य सुरू आहे.

ही दुर्घटना तिरुपतीतील सत्यवेडू मंडल अंतर्गत येणाऱ्या श्री सिटी परिसरात घडली. स्फोटाच्या वेळी कंपनीत नेमके किती कर्मचारी उपस्थित होते, याची माहिती अद्याप स्पष्ट झालेली नाही. स्फोटानंतर सर्वत्र ढिगारा घटनास्थळाचे व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आले आहेत. पोलीस आणि आपत्कालीन पथकांकडून घटनास्थळी शोध आणि बचावकार्य केले जात आहे. स्फोटात जखमी झालेल्या १० जणांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. मृतांपैकी काहींची ओळख पटली मिळालेल्या माहितीनुसार, मृतांपैकी गौरव रॉय (३५), चिन्ना मस्तान (३६) आणि रमेश (४०) अशी तिघांची ओळख पटली आहे.

तर गंभीर जखमी झालेल्या वासू (३६) यांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे 'डेक्कन क्रॉनिकल'च्या वृत्तात म्हटले आहे. अन्य मृत व्यक्तीची ओळख पटवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# शेतकऱ्यांना कर्ज वसुलीसाठी तगादा लावाल तर याद राखा!

## महसूलमंत्री बावनकुळे यांचा राज्यातील बँक, पतसंस्था आणि सावकारांना कडक इशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अकोला** – जिल्ह्यातील दुष्काळाची परिस्थिती पाहण्यासाठी आलेल्या महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर मोठं आश्वासन दिलंय. दुष्काळाच्या काळ भयंकर आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी, हीच सरकारची भूमिका असल्याचं बावनकुळे यांनी स्पष्ट केलंय.

दुष्काळामुळे झालेल्या नुकसानीचे अचूक पंचनामे करण्याच्या सूचना महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या मदतीची अपेक्षा असली तरी केंद्राची वाट न पाहता राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पावलं उचलणार असल्याचंही बावनकुळे म्हणालेत.

विशेष म्हणजे, दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना काय मदत देता येईल, याचा सरकारकडून विचार सुरू असल्याचं त्यांनी सांगितलंय. यासोबतच बँका आणि सावकारांकडून शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी तगादा लावला जाऊ नये, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना कडक सूचना दिल्याचंही महसूल मंत्र्यांनी स्पष्ट केलंय. शेतकऱ्यांना नोटीस किंवा पैशासाठी त्रास दिला जात असेल तर तात्काळ जिल्हाधिकारी किंवा आमदारांशी संपर्क साधण्याचं आवाहनही त्यांनी शेतकऱ्यांना केलंय. शेतकऱ्यांच्या समस्या आणि नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीचा आज आढावा घेण्यासाठी अकोल्यात आलो आहे. थेट जाऊन महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचा दौरा करीत आहे. त्याच अनुषंगाने आज शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आहे. त्यांची निवेदन स्वीकारली आहे. १००च्या वर निवेदनं स्वीकारली. यावरून समजतंय दुष्काळाच्या कळा भयंकर आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळावी, हेचं सरकारच धोरण आहे. दुसरीकडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकार लवकरच पाऊल उचलायला सुरुवात करणारेये. त्यासाठी राज्यातील धरण, तलावे खोलीकरण केल्या जाणार आहेत. पाण्याचा स्त्रोत वाढवण्यासाठीही सरकारचा पुढाकार राहणार आहे.

केंद्र सरकारची वाट न पाहता राज्य सरकार लवकरच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पाऊले उचलणार दरम्यान, मुख्यमंत्री स्वतः बांधावर जात आहेत, २६५ तालुके दुष्काळग्रस्त जाहिर झाले. १५ ते २० तालुके सुटले होते, काल कॅबिनेटमध्ये त्याचाही समावेश करण्याचा विचार आम्ही केला.

## थोडक्यात

### पूर्णेकर हत्या प्रकरणामध्ये आरोप-प्रत्यारोप : आणखी दोघांना अटक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***ठाणे*** – शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे मानपाडा विभागप्रमुख प्रदीप ऊर्फ बाळू पूर्णेकर यांच्या हत्येनंतर ठाण्यातील राजकीय आरोप–प्रत्यारोपांना वेग आला आहे. पूर्णेकर यांची मंगळवारी रात्री हत्या झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला आहे. प्रकरणाच्या तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासासाठी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाने शुक्रवारी आणखी दोन आरोपींना अटक केली. निखिल यादव आणि नितेश पवार यांना मुंबई–गोवा महामार्गावरील कनाळ्र्‌ अभयारण्य परिसरातून ताब्यात घेण्यात आले.

# नागपूर पदवीधर मतदारसंघात भाजपचा मास्टरप्लॅन, दिवसाला ४० हजार मतदारांशी संपर्क

## प्रतिष्ठेच्या लढतीत नितीन गडकरींसह देवेंद्र फडणवीस विजयी गुलाल उधळणार?

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***नागपूर*** – नागपूर पदवीधर मतदारसंघ हा नेहमी काँग्रेसचा बालेकिल्ला राहिला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे या मतदारसंघाशी भावनिक नाते आहे.

एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वडील गंगाधराव फडणवीस याच मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून यायचे, तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे देखील महाराष्ट्राच्या विधिमंडळात याच मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत होते. त्यामुळे या मतदारसंघाच्या निवडणुकीच्या प्रचाराला भारतीय जनता पक्षाने पहिल्या दिवसापासून आपली ताकद झोकून दिली आहे.

परिणामी यंदा गेल्या वेळेच्या पराभवाचा वचपा काढण्यासाठी नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात भारतीय जनता पक्षाने कंबर कसली असून थेट मतदारांशी संपर्क अभियान सुरु केले आहे. भारतीय जनता पक्षाच्या नागपूर वॉररूम कार्यालयात उभारण्यात आलेल्या कॉल सेंटरच्या माध्यमातून रोज चाळीस हजार मतदारांशी संपर्क साधला जात आहे. त्यामुळे आता भाजपने ही निवडणूक जिंकण्याच्या दृष्टीने जोरदार तयारी केल्याचं दिसून येत आहे एकीकडे काँग्रेस पक्षाने विधान परिषद निवडणुकीसाठी आपले तीन उमेदवार जाहीर केले असून या वर्षी नागपूर पदवीधर मतदारसंघात काँग्रेस पक्षाने विद्यमान आमदार अभिजित वंजारी यांच्यावर पुन्हा एकदा विश्वास टाकला आहे. काँग्रेस पक्षाने माज्यावर जो विश्वास टाकला ते अपेक्षित होता. मात्र या निवडणुकीत फक्त काँग्रेस मैदानात नाही, तर सरकारविरोधी समविचारी सर्व संघटना माझ्यासाठी मैदानात उतरल्या असल्याचे आमदार अभिजित वंजारी यांनी सांगितले. त्यामुळे एकप्रकारे भाजपपुढे काँग्रेसने मोठं आव्हान उभं केलं असताना भाजपने अद्याप आपला उमेदवार जाहीर केलेला नाही.

त्यामुळे हे आव्हान नेमकं कोण स्विकारतं आणि भाजपला कसा विजय खेचून आणून देतं, हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे. कारण नितीन गडकरी आणि गंगाधरराव फडणवीस यांनी या मतदारसंघात प्रतिनिधित्व केलेलं असल्याने भाजपासाठी ही जागा जिंकणे प्रतिष्ठेचा विषय आहे. त्यामुळे भाजपाही आपला तगडा उमेदवार घोषित करण्याची शक्यता आहे.

# ज्ञानेश्वरी काल, आज आणि उद्याही दिशादर्शक, सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचं सुतोवाच

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***मुंबई*** – ज्ञानेश्वरी आपल्याला जगाकडे पाहण्याचे आणि जीवन समजून घेण्याचे ज्ञान देते. काळाचा संदर्भ बदलला, तरी हे ज्ञान आणि त्यातून आलेली संस्कृती टिकून राहते.

ज्ञानेश्वरी काल, आज आणि उद्याही दिशादर्शक आहे असं वक्तव्य सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी केले. प्रत्येकाने ज्ञानेश्वरीतील एक तरी ओवी आपल्या आयुष्यामध्ये अनुभवावी, असे आवाहन ही त्यांनी केले. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५०व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून व्हॅल्युएबल ग्रुप प्रस्तुत आणि मेराक इव्हेंट्स आयोजित 'ज्ञानरंग: माऊलींच्या ओव्यांचा उत्सव'हा सो–हळा शुक्रवारी प्रभादेवी येथील रवींद्र नाट्यमंदिरात उत्साहात पार पडला. कार्यक्रमावेळी सरसंघचालक बोलत होते.

# अमरावतीतील रत्नापूर तलावात बुडून दोन तरुणांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



***अमरावती*** – शहरात फिरायला आलेल्या दोन तरुणांचा रत्नापूर तलावामध्ये बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संध्याकाळच्या सुमारास काही तरुण मातोश्री वृद्धाश्रम परिसरातील रत्नापूर तलावाच्या परिसरात फिरण्यासाठी आले होते. यादरम्यान काही जण पाण्यात उतरले, मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडायला लागले. उपस्थित स्थानिकांनी तातडीने धाव घेऊन त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला.या दुर्घटनेत दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच, अग्निशमन दलाचे जवानही घटनास्थळी दाखल झाले असून, तलावाच्या परिसरातून शोधकार्य सुरू आहे. रायगडपाठोपाठ घडलेल्या या घटनेमुळे पुन्हा एकदा पर्यटन आणि जलस्रोतांच्या ठिकाणी सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



# दादासाहेब फाळके चित्रनगरीसाठी मानखुर्दची १४ एकर जमीन : महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या बाह्य चित्रीकरणासाठी मुंबईतील मानखुर्द येथील सुमारे १४ एकर शासकीय जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला देण्यास महसूल विभागाने मान्यता दिल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी दिली.

मानखुर्द (ता.कुर्ला) येथील सर्व्हे क्रमांक १३८ पैकी तसेच लगतच्या मिळकतीतील अंदाजे १४ एकर म्हणजेच सुमारे ५६ हजार ६६६ चौ.मी. जमीन सांस्कृतिक कार्य विभागाला बाह्य चित्रीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल जमीन संहिता, १९६६ मधील कलम ४० नुसार प्राप्त अधिकारात महसूलमुक्त आणि भोगाधिकार मूल्यरहित किमतीने देण्यास सरकारने मान्यता दिली आहे. महाराष्ट्राच्या चित्रपटसृष्टीला आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. दादासाहेब फाळके यांच्या नावाने असलेल्या चित्रनगरीच्या विकासाकरिता बाह्य चित्रिकरणासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देताना शासनाने सार्वजनिक हित आणि जमिनीचा नियोजनबद्ध वापर यांचा समतोल साधल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

---

सीमेवरच्या महेंद्रीला मानाचा मुजरा

# जिल्हास्तरीय उत्कृष्ट कृषी पर्यटन पुरस्काराने सन्मानित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून कान्हेरी सरप येथील वेदनंदिनी कृषी पर्यटन केंद्र येथे जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवर असलेल्या प्रसिद्ध महेंद्री ॲग्रो टुरिझमला 'उत्कृष्ट कृषी पर्यटन केंद्र' हा जिल्हास्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला.



आज महेंद्री ॲग्रो टुरिझमला जागतिक दर्जा प्राप्त झाला आहे असे म्हणावे लागेल. अल्पावधीतच हे ठिकाण विदेशी पर्यटकांचे केंद्रबिंदू ठरले आहे. येथे दररोज विदेशी पाहुणे भेट देत असतात. चुलीवरची गरम भाकरी, ठेचा, वांग्याचे भरीत आणि बैलगाडीची सफर ही विदेशी पाहुण्यांसाठी विशेष पर्वणी ठरते. देशभरातील अनेक जंगलप्रेमी देखील येथे आवर्जून येतात.

तीन वर्षांपूर्वी सुरू झालेले हे पर्यटन केंद्र आज देश-विदेशात आकर्षणाचे केंद्र बनले आहे. जंगलाची खरी ओळख विजय श्रीराव यांनी पर्यटकांना करून दिली आहे. या परिसरात वाघ, अस्वल, रोही, रानडुक्कर, हरीण, तडस यांसारखे वन्यप्राणी आढळतात, याची माहिती विजयराव आवर्जून सांगतात. निसर्गाच्या कुशीत वसलेले महेंद्री हे पर्यटकांसाठी एक आकर्षणाचे केंद्र बनले असून महाराष्ट्रासह मध्यप्रदेशातूनही मोठ्या संख्येने पर्यटक येतात. येथे पर्यटकांसाठी बैलगाडी व ट्रॅक्टर सफारीची सुविधा असून चुलीवरच्या अस्सल गावरान जेवणासाठी हे ठिकाण विशेष प्रसिद्ध आहे.

या पुरस्कार सोहळ्याला व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी अध्यक्षस्थानी होते. उदघाटक म्हणून विकास पानसरे, अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना उपाध्यक्ष म्हणून, तर पर्यटन संचालनालय अमरावतीचे उपसंचालक विजय जाधव, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या प्रादेशिक व्यवस्थापक मोशमी कसे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोलाचे प्राध्यापक नितीन कोंडे, कृषी परिस्थितीकी केंद्राचे संचालक राजू इसाळ आणि वेदनंदिनी केंद्राचे संचालक प्रकाश पोहरे आदी मान्यवर उपस्थित होते. महेंद्री ॲग्रो टुरिझमचे संचालक विजय श्रीराव यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

---

'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत

# 'एक दिवा आशिर्वादाचा' संकल्पनेला अनुसरुन विशेष कार्यक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***अमरावती*** – कृषी विभाग,जिल्हा परिषद अमरावती यांच्या मार्फत 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सेवा संकल्प अभियानाचा एक भाग असलेल्या 'एक दिवा आशिर्वादाचा' या संकल्पनेस अनूसरून पंचायत समिती अमरावती अंतर्गत भानखेडा येथील महिला शेतकरी निर्मला बुंदिले यांच्याकडे भेट देऊन जिल्हा परिषदेचे जिल्हा कृषी अधिकारी (वि.घ.यो.) निलेश राठोड व पंचायत समिती, अमरावती कृषी अधिकारी पवन कुमार ढोमणे यांनी महिला सक्षमीकरण अभियानांतर्गत निर्मला बुंदिले यांच्या घरी भेट देऊन 'एक दिवा आशिर्वादाचा' या संकल्पनेतून प्रगतीची ज्योत पेटवली.



निर्मला बुंदिले या महिला शेतकरी सुरुवातीला कोरडवाहू शेती करीत होत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना सन २५-२६ अंतर्गत त्यांना नवीन विहीर या घटकाचा लाभ देण्यात आला. नवीन विहीर खोदकाम व बांधकाम करण्यासाठी त्यांना कृषी विभागाकडून चार लाख रुपयाचे अनुदान देण्यात आले. नवीन विहिरीला मुबलक पाणी लागल्यामुळे कोरडवाहू शेतीचे रूपांतर बागायती शेतीमध्ये होत असल्याबाबत निर्मला बुंदिले यांनी प्रशासनाचे आभार व्यक्त केले. तसेच येथून पुढे पाण्याचा कार्यक्षम वापर करून बारमाही शेती करणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले. 'एक दिवा आशिर्वादाचा' या संकल्पनेतून अधिकाऱ्यांनी येऊन प्रगतीची ज्योत तर पेटवलीच परंतु आमच्या शेतात सिंचनाचा शाश्वत स्त्रोतसुद्धा करून दिला असे मत निर्मला बुंदिले यांनी व्यक्त केले. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत विशेष घटकातील शेतकऱ्यांना भेटी देऊन त्यांना विविध कृषीविषयक योजनेचे मार्गदर्शन करण्याबाबतचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, अतिमुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके यांनी दिले असून कृषी विकास अधिकारी मल्ला तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सक्षमीकरण होण्याच्या दृष्टीने सेवा संकल्प अभियानांतर्गत विवीध उपक्रम जिल्हा परिषदेच्या कृषी विभागामार्फत संपूर्ण अमरावती जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.

शेतकरी बांधवांनी आपल्या शेतीमध्ये कायमस्वरूपी सिंचनाचा स्त्रोत निर्माण करून खऱ्या अर्थाने आपल्या जीवनामध्ये बारमाही शेतीच्या माध्यमातून स्वावलंबी होण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेचा लाभ घ्यावा.

---

# जागतिक फार्मासिस्ट दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप आणि वृक्षारोपण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जागतिक फार्मासिस्ट दिनाचे औचित्य साधून वरुड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटना आणि केमिस्ट फार्मासिस्ट महिला विंग यांच्या संयुक्त विद्यमाने वरुड ग्रामीण रुग्णालयात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमांतर्गत वरूड ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना चहा, नाश्ता, बिस्किट व ताज्या फळांचे वितरण करण्यात आले. रुग्णांची आपुलकीने चौकशी करत त्यांच्या लवकर आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यानंतर रुग्णालय परिसरात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. या संपूर्ण उपक्रमादरम्यान औषधी दुकानदारांचा एकमेकांशी आपुलकीचा संवाद घडवून आणणारा मनोमिलन कार्यक्रम सुद्धा पार पडला.

यावेळी या सामाजिक उपक्रमास केमिस्ट फार्मासिस्ट महिला विंगच्या वरुड तालुकाध्यक्षा प्राजक्ता बेहरे, श्रद्धा खोले, रुचीता अळसपुरे, सुप्रिया बंदे, ऐश्वर्या श्रीराव, नीता गुल्हाने, कल्याणी दामेधर आणि मोनाली जैन यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच वरुड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष मनोज गुल्हाने, राजेंद्र बहुरुपी, हरिष कानुगो, आशिष बंदे, राजू भोयर, प्रविण लड्ढा, गजेंद्र काळे, चंद्रकांत मेहरे, भारत टाकरखेडे, यशपाल जैन, नितीन खंडेलवाल, रवी जाधव, प्रविण राठी, पियुष चोबीतकर, जुनैद कुरेशी, अनुप लौहीया, नितीन पाटील, गोपाल तिवारी, सचिन गुल्हाने, अंकुश देवघरे, हर्षल मुसळे, दर्शन गुल्हाने, प्रतिक बरडे, अनुप कावनपुरे, स्वराज कोहळे, निकू देशमुख यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




रुग्णसेवेसोबतच सामाजिक बांधिलकी जपणारे हे उपक्रम वरुड तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटना आणि महिला विंगच्या वतीने यशस्वीपणे राबवल्याबद्दल नागरिकांमधून व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून कौतुक करण्यात येत आहे.

---

# एमपीएससीचे हरपाळकर यांची उचलबांगडी : सामान्य प्रशासन विभागाचा आदेश जारी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची शुक्रवारी अखेर उचलबांगडी करण्यात आली. हरपाळकर यांची आयोगावरील प्रतिनियुक्ती संपुष्टात आणून त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे.

त्यावेळी फडणवीस यांनी लोकसेवा आयोगाचे सचिव हरपाळकर यांची तत्काळ बदली करण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांना दिले होते. त्यानुसार सामान्य प्रशासन विभागाने शुक्रवारी हरपाळकर यांची प्रतिनियुक्ती संपुष्टात आणणारा निर्णय जारी केला.



विद्यार्थी आंदोलनानंतर निर्णय सहसचिव संवर्गातील अधिकारी असलेले महेंद्र हरपाळकर यांची २२ डिसेंबर २०२५ च्या आदेशाने दोन वर्षाच्या कालावधीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर सचिव म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली होती.

---

# तालुकास्तरीय मैदानी स्पर्धेमध्ये एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालयाचा दणदणीत विजय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***शेंदुरजनाघाट*** – युवक व सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या वतीने १९ वर्षे वयोगटातील तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा वसंतराव नाईक हायस्कूल, जरूड येथे २८ सप्टेंबला आयोजित करण्यात आल्या.



यामध्ये श्री एन.जी. मोघे कनिष्ठ महाविद्यालय, शेंदुरजनाघाट चा तनुज अकर्ते हातोडाफेक प्रथम, दिव्यांशू उपासे २०० मिटर धावणे प्रथम आणि १५०० मिटर धावणे तृतीय आला, वेदांत होले हातोडा फेक द्वितीय आणि गोळाफेक तृतीय, रोहित जाऊरकर १०० मिटर धावणे द्वितीय, मयूर बोवाडे थाळीफेक प्रथम, भालाफेक प्रथम, मुन्ना कुमरे थाळीफेक द्वितीय, नम्रता मनोटे थाळीफेक प्रथम, रोशन मालवीय गोळाफेक द्वितीय, भालाफेक द्वितीय, कृष्णाली गणोरकर भालाफेक प्रथम, राज चर्जन हर्डल्स द्वितीय, प्राची ठाकरे गोळाफेक तृतीय क्रमांक मिळिवला. या सर्व विजयी खेळाडूंना ज्येष्ठ क्रीडा शिक्षक योगेश सावरकर, प्रविण गणोरकर व योगेश अकर्ते यांनी मार्गदर्शन केले.

वरील सर्व विजयी खेळाडू व त्यांचे मार्गदर्शक क्रीडाशिक्षक यांचे हार्दिक अभिनंदन प्राचार्य मनोहर गणोरकर, पर्यवेक्षक उमेश काळे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

---

महात्मा फुले महाविद्यालयात महात्मा गांधी जयंतीनिमित्त

# स्पर्धा परिक्षा : १५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई व श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना त्यांच्या जीवन व कार्याची ओळख व्हावी, या उद्देशाने त्यांच्या जीवन व कार्यावर आधारित स्पर्धा परीक्षेचे आयोजन केले होते.



यामध्ये महाविद्यालयातील १५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला होता.

सदरील परीक्षा आयोजनासाठी यशवंतराव चव्हाण सेंटर, अमरावती जिल्ह्याचे अध्यक्ष तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या नेतृत्वात व यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावतीचे कोषाध्यक्ष प्रदीप देशमुख, व्यवस्थापक पंडित पंडागळे, प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांचे मार्गदर्शनाखाली कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका अलका पवार, यशवंतराव चव्हाण सेंटर अमरावती जिल्ह्याचे समिती सदस्य डॉ.चत्रभूज कदम यांनी सदरील परीक्षेचे यशस्वी आयोजन केले होते. तर कनिष्ठ महाविद्यालयातील रवींद्र वैद्य, निलेश ठाकरे, जितेश खडसे, डॉ.पुरूषोत्तम गेडाम, दीपक चंदनबावणे, प्रवीण नंदेश्वर, भाग्यश्री बुरंगे, भावना देशमुख, रोहिणी डवरे, पुनम नानोटकर, अश्विनी हिवसे, कविता चौधरी, प्रतिभा सिडाम, सुजाता खंडारे, वैशाली भागवत, वैशाली तानवैस, वैशाली गेडेकर, सारिका राऊत, सारिका खासबागे, महेंद्र सदापुरे व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# संपादकीय

**उठा, जागी व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थबकू नका**

## माझा भारत : विविधतेतून एकतेकडे जाणारा देश

भारत हा केवळ भौगोलिक सीमांनी बांधलेला देश नाही, तर विविध भाषा, धर्म, जाती, संस्कृती, परंपरा, विचारधारा आणि जीवनपद्धती यांना आपल्या कवेत सामावून घेणारी एक महान संस्कृती आहे. म्हणूनच भारताची ओळख जगात 'विविधतेत एकता' असलेला देश अशी आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातपासून ईशान्य भारतापर्यंत वेगवेगळ्या रंगांची, बोलींची आणि परंपरांची फुले उमललेली दिसतात; मात्र या सर्वांना जोडणारी भारतीयत्वाची भावना एकच आहे. भारतात शेकडो भाषा आणि बोली बोलल्या जातात. प्रत्येक राज्याची स्वतःची संस्कृती, वेशभूषा, खाद्यपरंपरा, लोककला आणि सण आहेत. महाराष्ट्रात गणेशोत्सव आणि पोळा उत्साहात साजरा केला जातो, पंजाबमध्ये बैसाखी, केरळमध्ये ओणम, पश्चिम बंगालमध्ये दुर्गापूजा, तमिळनाडूत पोंगल, तर ईशान्य भारतात विविध पारंपरिक उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे होतात. या विविधतेत भिन्नता असली तरी प्रत्येक सणामागे आनंद, बंधुभाव आणि समाजाला एकत्र आणण्याची भावना आहे. धर्माच्या बाबतीतही भारताची भूमी अत्यंत समृद्ध आहे. हिंदू, मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, बौद्ध, जैन, पारशी आणि इतर अनेक श्रद्धांचे लोक येथे शतकानुशतके एकत्र राहत आले आहेत. प्रत्येक धर्माची उपासना पद्धत वेगळी असली तरी माणुसकी, प्रेम, करुणा आणि परस्पर सन्मान ही मूल्ये सर्वांना जोडतात. भारताच्या संविधानाने प्रत्येक नागरिकाला धार्मिक स्वातंत्र्य दिले असून, विविधतेचा सन्मान करत समान नागरिकत्वाची संकल्पना मजबूत केली आहे. भारतीय संविधान हे आपल्या राष्ट्रीय एकतेचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहे. संविधानाने स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवले. नागरिक कोणत्याही धर्माचा, भाषेचा, जातीचा किंवा प्रदेशाचा असो, त्याचे अधिकार आणि कर्तव्ये भारतीय नागरिक म्हणून समान आहेत. त्यामुळे विविधतेतून एकतेकडे जाण्याचा मार्ग केवळ भावनिक नसून घटनात्मक मूल्यांवरही आधारित आहे. भारतीय एकतेची खरी परीक्षा संकटाच्या काळात होते. नैसर्गिक आपत्ती, युद्धजन्य परिस्थिती, महामारी किंवा इतर संकटांच्या वेळी देशातील नागरिकांनी एकमेकांना मदतीचा हात दिल्याची अनेक उदाहरणे आहेत. रक्तदान असो, आपत्तीग्रस्तांना मदत असो किंवा गरजूंसाठी अन्न व निवारा उपलब्ध करून देणे असो माणुसकीची भावना अनेकदा प्रादेशिक, धार्मिक आणि भाषिक भेदांच्या पलीकडे जाते. आजच्या डिजिटल युगात विविधतेला जोडण्याची नवी संधी निर्माण झाली आहे. सोशल मीडिया, इंटरनेट आणि आधुनिक दळणवळणामुळे देशाच्या एका कोपऱ्यातील घटना दुसऱ्या क्षणी दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचते.

# डनिंग-क्रुगर परिणाम : अज्ञानाचा आत्मविश्वास आणि ज्ञानाची नम्रता

आपल्यापैकी प्रत्येकाच्या आयुष्यात अशी एखादी व्यक्ती नक्कीच भेटलेली असते, जिला एखाद्या विषयाचे फारसे ज्ञान नसतानाही त्या विषयातील आपले ज्ञान सर्वाधिक असल्याचा ठाम विश्वास असतो. एखाद्या विषयाची प्राथमिक माहिती मिळाल्यानंतरच त्या विषयावर अंतिम मत मांडणे, इतरांना सल्ले देणे आणि स्वतःचे मतच योग्य असल्याचे समजणे ही मानवी वर्तनातील एक परिचित प्रवृत्ती आहे. मानसशास्त्रात या प्रवृत्तीला 'डनिंग-क्रुगर परिणाम' (ऊँपपळपस-घ्रींसशी एषषशलीं) असे म्हटले जाते. या संकल्पनेनुसार एखाद्या विशिष्ट क्षेत्रात कमी ज्ञान किंवा कौशल्य असलेल्या व्यक्तींना स्वतःच्या क्षमतेचा अंदाज प्रत्यक्ष क्षमतेपेक्षा जास्त असण्याची शक्यता असते.




डनिंग-क्रुगर परिणाम ही केवळ इतरांमध्ये दिसणारी बाब नाही. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, काही परिस्थितींमध्ये हा परिणाम आपल्यापैकी कोणाच्याही विचारात किंवा निर्णयप्रक्रियेत दिसू शकतो. त्यामुळे ही संकल्पना दुसऱ्यांवर टीका करण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या विचारपद्धतीकडे प्रामाणिकपणे पाहण्यासाठी उपयुक्त ठरते.

या संकल्पनेचा संबंध मानसशास्त्रज्ञ डेव्हिड डनिंग आणि जस्टिन क्रुगर यांच्या संशोधनाशी आहे. त्यांच्या अभ्यासातून असे दिसून आले की एखाद्या कामासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्य कमी असलेल्या व्यक्तींना स्वतःच्या चुका ओळखण्यातही अडचण येऊ शकते. कारण एखाद्या विषयाचे मूलभूत ज्ञानच कमी असल्यास, आपल्या उत्तरात किंवा निर्णयात काय चुकीचे आहे हे तपासण्यासाठी आवश्यक असलेली समजदेखील अपुरी असू शकते.

याचा साधा अर्थ असा की, एखाद्या व्यक्तीला एखाद्या विषयाचे थोडेसे ज्ञान मिळते आणि त्या मर्यादित ज्ञानामुळे तिला त्या विषयाची संपूर्ण माहिती असल्याचा भास होऊ शकतो. परंतु जेव्हा ती व्यक्ती अधिक अभ्यास करू लागते, वेगवेगळ्या बाजू समजून घेते आणि विषयाची गुंतागुंत लक्षात येते, तेव्हा स्वतःच्या ज्ञानाच्या मर्यादांची जाणीव होऊ लागते.

उदाहरणार्थ, एखाद्याने इंटरनेटवर काही व्हिडिओ पाहून गुंतवणुकीबद्दल प्राथमिक माहिती घेतली असेल. त्यानंतर त्याला शेअर बाजारातील सर्व बाबी समजल्याचा आत्मविश्वास निर्माण होऊ शकतो. मात्र प्रत्यक्षात अर्थव्यवस्था, जोखीम, बाजारातील चढ-उतार, कंपनीचे आर्थिक अहवाल आणि गुंतवणुकीची दीर्घकालीन तत्त्वे यांचा अभ्यास केल्यानंतर विषय किती व्यापक आहे, याची जाणीव होते. येथे प्रश्न व्यक्तीच्या बुद्धिमत्तेचा नसून आपल्या ज्ञानाच्या मर्यादांचे अचूक आकलन करण्याचा आहे.

आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात डनिंग-क्रुगर परिणामाची चर्चा अधिक महत्त्वाची ठरते. पूर्वी एखाद्या विषयाची माहिती मिळवण्यासाठी पुस्तके, तज्ज्ञ किंवा संस्थांचा आधार घ्यावा लागत असे. आता काही सेकंदांत असंख्य माहिती उपलब्ध होते. माहिती मिळवणे सोपे झाले आहे; मात्र माहितीची सत्यता तपासणे आणि तिचा योग्य संदर्भ समजून घेणे तितकेच आवश्यक आहे.

सोशल मीडियावर एखादा संदेश, व्हिडिओ किंवा पोस्ट पाहिल्यानंतर त्यातील माहिती खरी आहे की नाही याची पडताळणी न करता ती पुढे पाठवली जाते. काही वेळा व्यक्तीला त्या विषयातील तज्ज्ञांचे मतही चुकीचे वाटू शकते, कारण स्वतःकडे असलेल्या मर्यादित माहितीवर तिचा विश्वास अधिक असतो. अशा वेळी आत्मविश्वास आणि वास्तविक ज्ञान यांच्यातील अंतर वाढू शकते.

मात्र प्रत्येक आत्मविश्वासू व्यक्ती डनिंग-क्रुगर परिणामाचा बळी आहे असे म्हणणे योग्य ठरणार नाही. आत्मविश्वास ही सकारात्मक बाब आहे. समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा आत्मविश्वासाला ज्ञानाची पडताळणी, स्वतःच्या चुका स्वीकारण्याची तयारी आणि नवीन शिकण्याची इच्छा यांची जोड नसते.

खरे ज्ञान वाढले की नम्रता वाढण्याची शक्यता असते. एखाद्या क्षेत्रातील तज्ज्ञाला त्या विषयातील किती बारकावे, अपवाद आणि गुंतागुंत आहेत याची जाणीव असते. त्यामुळे 'मला सर्व काही माहीत आहे' असे म्हणण्याऐवजी 'या विषयात अजून शिकण्यासारखे आहे' अशी भूमिका अधिक दिसते. ही नम्रता म्हणजे कमकुवतपणा नसून ज्ञानाची परिपक्वता आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातही या परिणामाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. परीक्षेत एखादा विद्यार्थी काही प्रश्नांची उत्तरे बरोबर देतो म्हणून त्याला संपूर्ण धडा समजला आहे असे आवश्यक नाही. त्याचप्रमाणे एखादा विषय कठीण वाटत नाही म्हणून तो पूर्णपणे आत्मसात झाला आहे असेही मानता येत नाही. स्वतःची परीक्षा घेणे, चुका शोधणे, शिक्षकांकडून अभिप्राय घेणे आणि वेगवेगळ्या उदाहरणांवर ज्ञान लागू करून पाहणे यामुळे व्यक्तीला स्वतःच्या क्षमतेचा अधिक वास्तववादी अंदाज घेता येतो.

कार्यक्षेत्रातही याचे महत्त्व मोठे आहे. एखाद्या कर्मचाऱ्याला एखादे काम दोन-तीन वेळा यशस्वीरीत्या करता आले म्हणून त्या क्षेत्रातील सर्व समस्या सोडवण्याची क्षमता आपल्याकडे आली आहे असे समजणे धोकादायक ठरू शकते. उलट, अनुभवी व्यक्ती अनेकदा कामातील संभाव्य अडचणी आधीच ओळखते आणि आवश्यकतेनुसार इतरांचा सल्ला घेते. त्यामुळे टीमवर्क, अभिप्राय आणि सातत्याने शिकणे हे कोणत्याही क्षेत्रातील प्रगतीसाठी महत्त्वाचे ठरते.

डनिंग-क्रुगर परिणामाचा आणखी एक महत्त्वाचा धडा म्हणजे स्वतःच्या मतावर प्रश्न उपस्थित करण्याची तयारी. 'मी चुकीचा असू शकतो का?', 'माझ्याकडे पुरेसे पुरावे आहेत का?', 'या विषयातील तज्ज्ञ काय म्हणतात?', 'याच्या विरुद्ध काही तथ्य उपलब्ध आहे का?' असे प्रश्न विचारणे आपल्याला अधिक संतुलित विचार करण्यास मदत करते.

आज माहितीचा वेग प्रचंड आहे. आरोग्य, शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था, कायदा किंवा सामाजिक प्रश्नङ्कप्रत्येक क्षेत्रात तज्ज्ञ ज्ञानाची गरज असते. इंटरनेटवरील काही मिनिटांच्या माहितीच्या आधारे अंतिम निष्कर्ष काढण्यापेक्षा विश्वासार्ह स्रोत तपासणे, विविध मते समजून घेणे आणि गरज पडल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक जबाबदार पद्धत ठरते.

या संकल्पनेचा अर्थ असा नाही की कमी ज्ञान असलेली प्रत्येक व्यक्ती स्वतःला तज्ज्ञ समजते किंवा जास्त ज्ञान असलेली प्रत्येक व्यक्ती नम्रच असते. मानवी वर्तन अधिक गुंतागुंतीचे आहे. डनिंग-क्रुगर परिणाम हा विशिष्ट परिस्थितींमध्ये आपल्या क्षमतेबद्दल होणाऱ्या चुकीच्या आत्ममूल्यांकनाची शक्यता समजून घेण्यासाठी उपयोगी मानसशास्त्रीय चौकट आहे.

शेवटी या संकल्पनेतून मिळणारा सर्वांत मोठा संदेश स्वतःकडे पाहण्याचा आहे. दुसऱ्याच्या अज्ञानावर हसण्यापेक्षा आपल्या ज्ञानाच्या मर्यादा ओळखणे अधिक महत्त्वाचे आहे. 'मला माहिती नाही' हे वाक्य स्वीकारण्याची तयारी ही ज्ञानाच्या प्रवासाची सुरुवात असते. प्रश्न विचारणे, चुका मान्य करणे, अभिप्राय स्वीकारणे आणि सतत शिकत राहणे यामुळे आत्मविश्वासाला वास्तवाची जोड मिळते.

माहितीच्या महासागरात आज प्रत्येकाच्या हातात ज्ञानाची साधने आहेत; परंतु साधन उपलब्ध असणे आणि ज्ञान प्राप्त होणे यात फरक आहे. खरे ज्ञान केवळ माहिती जमा करण्यात नसते, तर त्या माहितीचे परीक्षण, आकलन आणि योग्य वापर करण्यात असते. म्हणूनच आत्मविश्वास हवा, पण त्याला आत्मपरीक्षणाची जोड हवी; मत हवे, पण त्याला तथ्यांचा आधार हवा; आणि ज्ञान हवे, पण त्यासोबत शिकत राहण्याची नम्रताही हवी.

डनिंग-क्रुगर परिणाम आपल्याला दुसऱ्यांच्या चुका दाखवण्यासाठी नव्हे, तर स्वतःच्या विचारांना आरसा दाखवण्यासाठी महत्त्वाचा आहे. कारण खऱ्या अर्थाने ज्ञानी व्यक्ती तीच, जिला आपल्या ज्ञानाची ताकद कळते आणि त्याच वेळी आपल्या अज्ञानाची जाणीवही असते.

# फर्मी विरोधाभास : विश्व अफाट, मग परग्रहवासीय कुठे आहेत?



रात्रीच्या स्वच्छ आकाशाकडे पाहताना असंख्य तारे दिसतात. आधुनिक विज्ञानाने मात्र आपल्याला हेही सांगितले आहे की आपण पाहतो त्यापेक्षा विश्व कितीतरी विशाल आहे. अब्जावधी आकाशगंगा, प्रत्येक आकाशगंगेत असंख्य तारे आणि त्यांपैकी अनेक ताऱ्यांभोवती फिरणारे ग्रहया अफाट विश्वात पृथ्वीवरच जीवन निर्माण झाले असेल का, हा प्रश्न मानवाला दीर्घकाळापासून पडत आला आहे. जर विश्व इतके विशाल आहे आणि जीवनासाठी योग्य परिस्थिती असलेले अनेक ग्रह असण्याची शक्यता आहे, तर मग आजपर्यंत आपल्याला परग्रहावरील बुद्धिमान जीवनाचा ठोस पुरावा का मिळालेला नाही? या प्रश्नालाच विज्ञानाच्या क्षेत्रात 'फर्मी विरोधाभास' असे म्हटले जाते.

'फर्मी विरोधाभास' ही संकल्पना भौतिकशास्त्रज्ञ एन्रिको फर्मी यांच्या नावाशी जोडली जाते. साध्या भाषेत प्रश्न असा आहे जर बुद्धिमान परग्रहवासी असण्याची शक्यता इतकी मोठी असेल, तर ते दिसत का नाहीत? हा प्रश्न ऐकायला साधा वाटतो; परंतु त्यामागे खगोलशास्त्र, जीवशास्त्र, तंत्रज्ञान आणि मानवजातीच्या भवितव्याशी संबंधित अनेक गुंतागुंतीचे प्रश्न दडलेले आहेत.

विश्वाच्या प्रचंड आकारामुळे हा विरोधाभास अधिक रोचक बनतो. आपल्या आकाशगंगेतच शेकडो अब्ज तारे असल्याचा वैज्ञानिक अंदाज आहे. त्यापैकी अनेक ताऱ्यांभोवती ग्रह आहेत. काही ग्रह त्यांच्या ताऱ्याच्या अशा प्रदेशात असू शकतात, जिथे तापमान जीवनासाठी अनुकूल असण्याची शक्यता असते. अशा प्रदेशाला साधारणपणे 'हॅबिटेबल झोन' म्हणजेच जीवनयोग्य क्षेत्र असे म्हटले जाते. मात्र एखादा ग्रह या क्षेत्रात असणे म्हणजे तेथे जीवन आहे, असा थेट निष्कर्ष काढता येत नाही.

पृथ्वीवर जीवनाची निर्मिती कशी झाली, हा प्रश्नही पूर्णपणे सुटलेला नाही. साध्या रासायनिक घटकांपासून जटिल जीवनाची सुरुवात कशी झाली आणि त्यानंतर बुद्धिमान जीवांची उत्क्रांती कशी घडली, याबाबत विज्ञानाने अनेक गोष्टी समजून घेतल्या आहेत; परंतु या प्रक्रियेतील सर्व टप्प्यांची पूर्ण उत्तरे अद्याप उपलब्ध नाहीत. त्यामुळे विश्वात जीवन असण्याची शक्यता आणि बुद्धिमान, तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या जीवांची संख्या यामध्ये मोठा फरक असू शकतो.

फर्मी विरोधाभास समजून घेण्यासाठी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'जीवन' आणि 'बुद्धिमान जीवन' यातील फरक. पृथ्वीवर कोट्यवधी वर्षे जीवन अस्तित्वात आहे; परंतु आधुनिक तंत्रज्ञान निर्माण करणारी मानवजात पृथ्वीच्या इतिहासाच्या तुलनेने अगदी अलीकडची आहे. त्यामुळे एखाद्या ग्रहावर सूक्ष्मजीव किंवा साधे जीव असू शकतात, पण ते रेडिओ संदेश पाठवण्याइतके किंवा अंतराळयान तयार करण्याइतके प्रगत असतीलच असे नाही.

याशिवाय, दोन बुद्धिमान संस्कृतींच्या अस्तित्वाचा काळ एकमेकांशी जुळणे आवश्यक आहे. समजा एखाद्या ग्रहावर लाखो वर्षांपूर्वी बुद्धिमान संस्कृती अस्तित्वात होती; परंतु ती आता नाही. त्या काळात पृथ्वीवरील मानवाला त्या संस्कृतीशी संपर्क साधण्याची क्षमता नव्हती. उलट, आज आपण रेडिओ दुर्बिणींमधून संकेत शोधत असताना दुसरी एखादी संस्कृती अद्याप तंत्रज्ञानाच्या प्राथमिक अवस्थेत असू शकते. त्यामुळे अंतराळातील संस्कृतींच्या 'वेळेचे अंतर' हेही संपर्कातील मोठे आव्हान ठरू शकते.

यामागे आणखी एक शक्यता म्हणजे अंतराळातील अंतर. प्रकाशाला एका सेकंदात सुमारे तीन लाख किलोमीटर अंतर पार करता येते. तरीही विश्वाच्या प्रमाणात ही गतीही अपुरी वाटू शकते. अनेक संभाव्य ग्रह पृथ्वीपासून प्रचंड अंतरावर आहेत. एखाद्या ग्रहावरून संदेश निघाला तरी तो पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक वर्षे, शतके किंवा त्याहून अधिक काळ लागू शकतो. आपण पाठवलेल्या संदेशाचे उत्तर येण्यासाठीही तितकाच मोठा कालावधी लागू शकतो. मानवाने आतापर्यंत परग्रहावरील जीवनाचा शोध घेण्यासाठी विविध पद्धतींचा वापर केला आहे. रेडिओ दुर्बिणींच्या साहाय्याने अंतराळातून येणारे असामान्य संकेत शोधले जातात. काही संशोधन प्रकल्प तर्‍ा?यांभोवती फिरणाऱ्या ग्रहांचा अभ्यास करून तेथे जीवनासाठी आवश्यक परिस्थिती आहे का, याचा शोध घेत आहेत. ग्रहांच्या वातावरणात विशिष्ट वायूंचे अस्तित्व आढळल्यास तेथे जीवनाची शक्यता तपासता येते. मात्र आजपर्यंत असा कोणताही पुरावा मिळालेला नाही, ज्यावरून पृथ्वीबाहेरील बुद्धिमान जीवन निश्चितपणे सिद्ध होते.

काही शास्त्रज्ञांच्या मते, कदाचित बुद्धिमान संस्कृती स्वतःच्या तंत्रज्ञानामुळेच नष्ट होत असतील. एखादी संस्कृती अत्यंत प्रगत तंत्रज्ञान विकसित करते, परंतु त्याच तंत्रज्ञानाचा गैरवापर, संसाधनांचा ऱ्हास किंवा इतर मोठ्या संकटांमुळे तिचे अस्तित्व संपुष्टात येऊ शकते. या कल्पनेशी संबंधित चर्चेत 'ग्रेट फिल्टर' ही संकल्पना मांडली जाते. म्हणजेच जीवनाच्या विकासाच्या प्रवासात एखादा अत्यंत कठीण टप्पा असू शकतो, जो बहुतेक संस्कृती पार करू शकत नाहीत. मात्र हा एक वैज्ञानिक गृहीतक आहे; त्याचा निश्चित पुरावा उपलब्ध नाही. दुसरी शक्यता अशीही मांडली जाते की परग्रहावरील बुद्धिमान संस्कृती अस्तित्वात असतील, पण त्या आपल्याशी संपर्क साधण्यास इच्छुक नसतील. कदाचित त्यांना पृथ्वीसारख्या तरुण संस्कृतीशी संपर्क साधण्याची गरज वाटत नसेल. किंवा त्यांच्याकडे संवाद साधण्याच्या अशा पद्धती असतील, ज्या आपल्या सध्याच्या तंत्रज्ञानाला समजत नाहीत.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# पंजाबराव लुंगे यांचे निधन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - येथील युवा शेतकरी तुषार लुंगे यांचे वडील पंजाबराव लुंगे यांचे नुकतेच निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्यामागे तूषार, मंगला , योगिता ह्या मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर



हिंदू स्मशानभूमी येथे अंत्य संस्कार करण्यात आले.

देशाच्या विकासात्मक जडणघडणीमध्ये

# महात्मा गांधी यांचे योगदान महत्वपूर्ण : प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** - येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती




समारोह उत्साहात साजरा झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्रमुख वक्ते म्हणुन डॉ.दिनेश खेरडे, प्रमुख अतिथी म्हणुन कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, डॉ.प्रशांत चर्जन उपस्थित होते. प्रा.सुधीर बानुबाकोडे यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका विशद केली तर प्रमुख क्ते डॉ.दिनेश खेरडे यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारधारेचा आढावा घेऊन त्यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरक असल्याचे सांगितले.

प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्य लढ्यातील कार्य विशद करून भारताच्या विकासात्मक जडणघडणीमध्ये त्यांचे असलेले महत्त्वपूर्ण योगदान विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपशिखा दरवई तर आभार रिया धारगे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये

# विद्युत सुरक्षा जनजागृती कार्यक्रम उत्साहात

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - स्थानिक न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांसाठी 'विद्युत सुरक्षा' या विषयावर जनजागृती कार्यक्रम उत्साहात आयोजित करण्यात आला. लहान वयातच विद्यार्थ्यांना विजेपासून सुरक्षित राहण्याच्या सवयी लागाव्यात, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाला शाळेच्या प्राचार्य माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, प्री-प्रायमरी समन्वयक पराग भोंडे तसेच शाळेचे पी.आर.ओ. किशोर देशमुख यांची उपस्थिती होती.



कार्यक्रमाचे संचालन व प्रात्यक्षिक स्वाती मोरे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात घरामध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध वीजेवर चालणाऱ्या वस्तू प्रत्यक्ष दाखविण्यात आल्या. स्विच, प्लग, वायर, चार्जर तसेच इतर विद्युत उपकरणे दाखवून त्यांचा वापर करणे अत्यंत धोकादायक आहे व त्या संबंधित कोणती काळजी घ्यावी, हे विद्यार्थ्यांना सोप्या व कृतीशील पद्धतीने समजावून सांगण्यात आले. प्राचार्य माधुरी भोंडे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना, वीज आपल्या दैनंदिन जीवनासाठी उपयुक्त असली तरी तिचा वापर करताना सुरक्षिततेची काळजी घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. लहान मुलांनी कोणतीही विद्युत उपकरणे स्वतःहून हाताळू नयेत आणि आवश्यकतेनुसार नेहमी मोठ्यांची मदत घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

श्वेता गणोरकर यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील उदाहरणे देत विजेच्या वस्तूंपासून सुरक्षित अंतर कसे ठेवावे आणि धोकादायक परिस्थिती ओळखून मोठ्यांना त्याबाबत कसे सांगावे, याबाबत मार्गदर्शन केले.

तसेच पराग भोंडे यांनी विद्यार्थ्यांना स्विच, प्लग, सॉकेट, वायर आणि चार्जर यांचा वापर करताना घ्यावयाच्या काळजीबाबत सोप्या भाषेत माहिती दिली. ओल्या हाताने स्विच किंवा विद्युत उपकरणांना स्पर्श करू नये, सॉकेटमध्ये बोटे किंवा कोणतीही वस्तू घालू नये, खराब किंवा तुटलेल्या वायरपासून दूर राहावे आणि विद्युत उपकरणांचा वापर करताना मोठ्यांची मदत घ्यावी, अशा महत्त्वाच्या सूचना त्यांनी विद्यार्थ्यांना दिल्या.

लहान मुलांना समजेल अशा पद्धतीने प्रत्यक्ष वस्तू दाखवून व प्रात्यक्षिकांसह देण्यात आलेल्या या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या उपक्रमातून प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांमध्ये विद्युत सुरक्षेबाबत प्राथमिक ज्ञान, जागरूकता आणि सुरक्षिततेच्या सवयी निर्माण करण्यास मदत झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव श्याम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया तसेच सदस्य विनय यावलकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

जनता हायस्कूल येथे

# महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती साजरी



■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** - जनता हायस्कूल व श्री एन.जी.मोघे कनिष्ठ महाविद्यालय आणि जनता उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री यांच्या जयंतीचा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य मनोहर गणोरकर तर प्रमुख अतिथी म्हणुन पर्यवेक्षक उमेश काळे, प्रा.प्रदिप काळे, विजय सलामे, योगेश फुटाणे इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम दोन्ही विभुतींच्या फोटोंचे पुजन व हारार्पण करण्यात आले. त्यानंतर वर्ग ५ ते १२ पर्यंतच्या बऱ्याच विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवन कार्याविषयी भाषणे दिली.

यावेळी नगर परिषद कार्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या मातीची गणेशमूर्ती बनविणे या स्पर्धेमध्ये क्रमांक प्राप्त केलेल्या हर्ष ठाकरे, श्लोक सरोदे, ध्रुव सावरकर, रोहन अकर्ते व नाविन्य राऊत या विद्यार्थ्यांना विशेष भेटवस्तू व प्रमाणपत्र आणि सर्व सहभागी विद्यार्थ्यांना कलर बॉक्स व प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.

अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य मनोहर गणोरकर यांनी भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची माहिती दिली व विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन पद्मजा खडके तर आभार रिया जयस्वाल हिने मानले.

# महाराष्ट्राच्या ८७७ किमी किनारपट्टीचा एकात्मिक विकास साधणार, मंत्री नितेश राणे यांची घोषणा

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** - महाराष्ट्राची ८७७ किलोमीटर लांबीची किनारपट्टी, बंदरांचे विस्तृत जाळे आणि मजबूत औद्योगिक व उत्पादन क्षेत्र ही राज्याची मोठी सागरी ताकद असून, या क्षमतेचा एकात्मिक विकास करण्यावर राज्य सरकारचा भर आहे, असे मत मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे



यांनी शुक्रवारी व्यक्त केले. रस्ते आणि रेल्वे यांच्याशी बंदरांची जोडणी, जलवाहतूक आणि शहरी वाहतुकीचे एकत्रीकरण, तसेच सागरी पायाभूत सुविधांना औद्योगिक विकासाची जोड देण्याचे राज्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्रीय बंदरे, नौवहन आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, गुंतवणूकदार, सागरी क्षेत्रातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रतिनिधी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

# 'विनर्स अकॅडमी'ला ठोकले सील

## दिवेआगर दुर्घटनेनंतर प्रशासनाची मोठी कारवाई

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** - रायगड जिल्ह्यातील दिवेआगर समुद्रकिनारी सहलीदरम्यान बुडून मृत्यू झालेल्या ८ विद्यार्थ्यांच्या दुर्घटनेनंतर प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. कोणत्याही प्रकारच्या अधिकृत परवान्याशिवाय आणि ना हरकत प्रमाणपत्राशिवाय आळंदीत बेकायदेशीरपणे चालवली जाणारी 'विनर्स अकॅडमी' ही खासगी शिकवणी




वर्ग संस्था आळंदी नगरपरिषदेने शुक्रवारी सील केली आहे. गुरुवारी घडलेल्या या दुर्दैवी घटनेत, आळंदी येथील विनर्स अकॅडमीचे ४८ जणांचे विद्यार्थी आणि शिक्षकांचे पथक (२५ मुले, १७ मुली आणि ६ शिक्षक) दिवेआगर बीचवर सहलीला गेले होते. यादरम्यान, १६ वयोगटातील ८ विद्यार्थी समुद्राच्या पाण्याचा आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने खोल पाण्यात गेले आणि पाण्याचा लोट त्यांना ओढून नेल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्हाधिकाऱ्यांचा मोठा निर्णय, पाणी उपस्यावर बंदीचे आदेश, तर यवतमाळ जिल्ह्याबाहेर चारा वाहतुकीस बंदी




■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वाशिम** - जिल्ह्यात धरण प्रकल्पात अवघा ३९ टक्के जलसाठा असून दुष्काळात संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रशासनाने आता या संदर्भात एक मोठा निर्णय घेतला आहे.

जिल्ह्यातील तलावातून पाणी उपस्यावर बंदीचे आदेश वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिली आहे. वाशिम जिल्ह्यात यंदा कमी पाऊस बरसल्याने जिल्ह्यातील सर्वच तलाव, धरणप्रकल्पात केवळ ३९ टक्के इतका जलसाठा उपलब्ध आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तलावातील पाणी उपशावर बंदीचे जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले आहे. दुष्काळात संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रशासनामार्फत हा मोठा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आहे. तलावांच्या संरक्षणाची जबाबदारी आता ग्रामपंचायत स्तरावर निश्चित; पथकाद्वारे पाणी उपस्यावर नजर दरम्यान, वाशिम जिल्हा परिषदे अंतर्गत ४१९ तलावांतून पाणी उपसा बंदीचे आदेश देण्यात आले आहे.

पाणी उपशाचे वैध परवानेही तात्पुरत्या कालावधीसाठी रद्द करण्यात आले आहे. तर पंप, मोटर, इंजिन, पाइपलाइनद्वारे होणाऱ्या उपशावर प्रशासनाची करडी नजर असून गाव पातळीवर पथक द्वारे पाणी उपस्यावर नजर ठेवली जाणार आहे.

पिण्याचे पाणी, जनावरे आणि अत्यावश्यक गरजांसाठी तलावातील पाणी राखीव असून अवैध पाणी उपसा आढळल्यास तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

# महात्मा फुले महाविद्यालयात मशरुम उत्पादन व उद्योजकतेवर एकदिवसीय कार्यशाळा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय, वरुड येथील वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने मशरूम उत्पादन व उद्योजकता या विषयावर एकदिवसीय कौशल्याधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मशरूम उत्पादनाचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळावे तसेच या क्षेत्रातील स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या संधींची माहिती व्हावी, हा कार्यशाळेचा प्रमुख उद्देश होता.




कार्यशाळेची सुरूवात महाविद्यालयाचे प्राचार्य व कार्यशाळेचे अध्यक्ष डॉ.दिलीप हांडे, प्रमुख मार्गदर्शक व मान्यवरांच्या हस्ते डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.पी.डब्ल्यू.देवतारे, माजी विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती तसेच कु.खुशी आर.गुप्ता, संस्थापक, खुशी न्यूट्रिशरूम फूड्स, अमरावती उपस्थित होते. यावेळी वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.व्ही.सातपुते, आयोजक समितीचे सदस्य डॉ.एम.बी.बोबडे, डॉ.पी.जे.देशमुख व प्रा.एस.एस.साखरे हे उपस्थित होते.

कार्यशाळेचे प्रास्ताविक व प्रमुख मार्गदर्शक यांचा परिचय प्रा.एस. एस. साखरे यांनी करून दिला. त्यानंतर बॉटनिकल सोसायटीच्या सचिव कीर्ती व्यास यांनी शैक्षणिक सत्र २०२५-२०२६ मधील वनस्पतीशास्त्र विभागाचा वार्षिक अहवाल सादर केला.

कार्यशाळेचे उद्घाटन डॉ.पी.डब्ल्यू.देवतारे यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात त्यांनी कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व तसेच वैज्ञानिक ज्ञानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय कौशल्य विकसित करण्याची गरज स्पष्ट केली.

तांत्रिक सत्रात खुशी आर.गुप्ता यांनी मशरुम उत्पादनापासून फायदेशीर उद्योगापर्यंत या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी मशरुम उत्पादनाचे महत्त्व, उत्पादनाच्या विविध पद्धती, त्यातून मिळणारे उत्पन्न आणि स्वयंरोजगाराच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच त्यांनी स्वतः तयार केलेली काही मशरूम उत्पादने विद्यार्थ्यांना दाखवून त्यांच्या उपयोगाबाबत माहिती दिली.

कार्यशाळेचे अध्यक्ष व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी अध्यक्षीय भाषणातून वनस्पतीशास्त्र विभागाच्या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांनी व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करून उपलब्ध उद्योजकीय संधींचा लाभ घ्यावा व कौशल्याधारित शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचा समारोप बॉटनिकल सोसायटीच्या अध्यक्षा दिव्यानी वाघे यांनी मानलेला आभारप्रदर्शनाने झाला. या कार्यशाळेस महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील उद्यानविद्या शाखेचे विद्यार्थी, पत्रकार व माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# सिंधुदुर्गाच्या आंबा-काजू शेतीला एआयची साथ : आठही तालुक्यांत २ वर्षांचा प्रायोगिक प्रकल्प; उत्पादनवाढीसह बचतीचे उद्दिष्ट

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**सिंधुदुर्गनगरी** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त कार्यक्रम सादर झाला. याप्रसंगी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोचे हारार्पण व पूजन मुख्याध्यापिका नीता चिमोटे व आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिका चिमोटे यांनी अध्यक्षीय भाषणातुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वर्ग सातवी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर भाषणे व कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक शिक्षक जयकुमार फरकुंडे व आभार शिक्षक प्रशांत आंडे यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक, शिक्षिका,



शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना न्याय देत वार्षिक उत्पन्नाचा गाठला उच्चांक

# कृषी उत्पन्न बाजार समिती ची वार्षिक सर्वसाधारण सभा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – कृषी उत्पन्न बाजार समितीचे वार्षिक सर्वसाधारण सभा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात माजी आमदार तथा सहकार महर्षी नरेशचंद्र ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली व राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे उपस्थितीत सभा संपन्न झाली.







सभेचे प्रास्ताविकामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकासाबाबत शेतकऱ्यांना न्याय देत विकास कसा साधला याबाबत सभेला माहिती दिली. वर्ष भर संचालक मंडळाचे केलेले कामाचा लेखा जोखा सभे समोर मांडला. कृषी उत्पन्न बाजार समितीने सन २०२५ –२६ मध्ये आजपर्यंतच्या इतिहासातील सर्वाधिक उत्पन्नाचा उच्चांक गाठला असून विकासाला चालना दिली या विकास मागे मार्गदर्शक नरेशचंद्र ठाकरे, विक्रम ठाकरे सर्व संचालक मंडळ मतदार व कर्मचारी व हितचिंतक यांचा सिंहाचा वाटा असून पंचावन्न दुकान गाडे धान्यबाजारा करिता लिलाव शेड दोन मोठे हॉल जवळपास नऊ कोटी रुपयांचे बांधकाम चालू असून कामे लवकरच पूर्ण करून व्यापारी शेतकरी यांना वाटप करून त्यांच्या सेवेत देण्यात येऊन त्यापासून बाजार समितीच्या उत्पन्नात भर पाडण्यात येईल तसेच उपबाजार राजुरा बाजार येथे प्लॉट काटा व दुकान गाड्यांचे बांधकाम करणे उप बाजार लोणी येथे प्लॉट काटा बांधकाम करण्याचे काम प्रस्तावित असून ते सुद्धा काम लवकर करण्यात येईल असे सभापती यांनी सांगितले तर माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीने शेतकऱ्यांना न्याय देत मोठ्या प्रमाणावर विकासाकडे वाटचाल केली असल्याचे सांगून मतदारांनी संचालक मंडळाला निवडून दिल्यामुळे या विकासामध्ये मतदारांचा फार मोठा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी नरेशचंद्रजी ठाकरे यांच्या नेतृत्वातील कृषी उत्पन्न बाजार समिती सह सर्व सहकारी संस्था चांगल्या असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून उद्धव वानखडे, माजी जि.प.सदस्य गोपाल मालपे, बाबाराव बहुरूपी, तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष तुषार निकम, माजी अध्यक्ष राजेंद्र पाटील, सहायक निबंधक डॉ. आशिष चर्जन, उपसभापती बाबाराव मांगुळकर, संचालक राजेश गांधी, प्रमोद पाटील, वनराज कराळे, बाबाराव लोखंडे, जाबीर खा जहागीर खा, सुजित पाटील, अमित कुबडे, प्रवीण मानकर, मुकेश देशमुख, अंकुश कडू पाटील, प्रशांत पाटील बहुरुपी, प्रणय सोंडे, हिराकांत उईके, नरेंद्र पांडव, संचालिका अर्चना मुरूमकर, रोशनी मानकर, सचिव नंदकिशोर बोडखे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. सभेचे संचालन मनोज ढोके तर आभार प्रदर्शन प्रणय सोंडे यांनी मानले.

# स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्स येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी या महान व्यक्तिमत्त्वांच्या विचारांचा आदर्श घेऊन राष्ट्राच्या विकासात आपले योगदान द्यावे, असे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे, ग्रंथालयशास्त्र विभाग प्रमुख प्रा.विजय ठाकरे, बीसीए विभाग प्रमुख प्रा.अनुप बेले, बीबीए विभाग प्रमुख प्रा.चेतन गनोरकर, बीएजेएमसी विभाग प्रमुख प्रा.राहुल शिवारे, प्रा.सौरभ अकोटकर, सांस्कृतिक विभाग अध्यक्ष प्रा.संजीवनी बारस्कर, प्रा.आशिष शहाणे, प्रा.रोशन वानखडे, प्रा.चेतन ढोले, प्रा.आलिया खान, प्रा.माधवी घोरमाडे, प्रा.साक्षी राठी, प्रा.अस्मिता गेडाम, प्रा.चेतना सावरकर, प्रा.धनश्री खंडार, प्रा.गौरी कुबडे, प्रा.कविता बेहेरे, यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा गांधी यांच्या सत्य-अहिंसेच्या विचारांसोबतच लालबहादूर शास्त्री यांच्या देशसेवा, साधेपणा आणि कर्तव्यनिष्ठेचा संदेश देत महाविद्यालयात दोन्ही महापुरुषांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

## न्यायालयाचा मनाई हुकूम मोडून शेतात प्रवेश केल्याप्रकरणी

# पुसलाच्या हुमनपेठेत चौघांविरुध्द गुन्हा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यायालयाचा मनाई हुकूम मोडून शेतात प्रवेश करुन शिविगाळ प्रकरणी पुसलाच्या हुमनपेठेत चौघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




हकीकत अशा प्रकारे आहे की, पुसला येथील हुमनपेठ येथे आशिष सुरेश शिरभाते यांचा ताबा असलेल्या शेतात यातील आरोपी रमेश शिरभाते व कांता रमेश शिरभाते यांनी विद्यमान न्यायालयाच्या मनाई हुकूम माहीती असतांना सुध्दा मनाई हुकुमाचा अपमान करुन बेकायदेशीरपणे फिर्यादीच्या शेतात प्रवेश करुन शेतामध्ये बेकायदेशीरपणे काम करीत असल्याचे व स्वत:चे मालकी हक्क असल्याचे फोटो काढुन भविष्यातील कायदेशीरपणे कार्यवाहीतून वाचविण्याकरीता आम्ही शेत पेरत असल्याचा खोटा दावा सांगता यावा, अशा उददेशाने शेतात बेकायदेशीर प्रवेश केला व तसेच आशिषला यावर्षी मीच माल घरी नेणार, असे म्हणुन अर्वाच्च भाषेत शिवीगाळ केली व तुला जिवंत सोडणार नाही, अशी जिवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी आशिष सुरेश शिरभाते (३५) रा.पुसला यांचे फिर्यादीवरुन शेंदुरजनाघाट पोलिसांनी रमेश भुराजी शिरभाते, शैलेश रमेश शिरभाते, नुतन शैलेश शिरभाते व कांता रमेश शिरभाते यांचे विरुध्द ३२९, ३५२, २९६ बी.एन.एस.अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे

# महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री जयंती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक स्व.माणिकलालजी गांधी जागृत विद्यालय येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वतंत्र भारताचे दुसरे पंतप्रधान लालबहादुर शास्त्री या दोन्ही महापुरुषांची जयंती साजरी करण्यात आली.




यावेळी महात्मा गांधी यांच्या वेशभूषेत वर्ग ७ चा मिथिलेश राऊत आणि लालबहादुर शास्त्री यांच्या वेशभूषेत प्रीत गणोरकर या कार्यक्रमात सहभागी होऊन आकर्षण ठरले. गांधीचे जगपातळीवरील विचार तसेच शास्त्री यांचे साधी राहणी पण उच्च विचारसरणी या प्रमुख बाबीवर अंश मोहोड, आनंदी सोनटक्के, प्रियांशी तट्टे, लावण्य या विद्यार्थांनी स्वतःचे विचार मांडले. त्यात मनोगत व्यक्त करण्यासाठी शाळेतील विद्यार्थी सहभागी झालेत. तसेच प्रतिमेचे पूजन करुन त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी मुख्याध्यापक विजय आडे, उपमुख्याध्यापिका माधुरी मेश्राम, पर्यवेक्षक प्रशांत वडे, जागृत इंग्लिश प्रायमरीच्या मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, सविता लाडोळे सर्व शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन तर आभार शिक्षक सत्यपाल धाकडे यांनी मानले.

## डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे

# महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंती




(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथे महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त कार्यक्रम सादर झाला.

याप्रसंगी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या फोटोचे हारार्पण व पूजन मुख्याध्यापिका नीता चिमोटे व आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्याध्यापिका चिमोटे यांनी अध्यक्षीय भाषणातुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वर्ग सातवी व पाचवीच्या विद्यार्थ्यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनावर भाषणे व कविता सादर केल्या.

कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक शिक्षक जयकुमार फरकुंडे व आभार शिक्षक प्रशांत आंडे यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व विद्यार्थी शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# विविध योजनांचे हप्ते ठरलेल्या वेळेवर नियमित पाठवा

## महसूल तंटामुक्त गाव समितीच्या वतीने सामाजिक न्याय मंत्र्यांकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्रावणबाळ पेन्शन योजना, विधवा पेन्शन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे हप्ते नियमित महिन्यावार पाठविण्यात यावे, अशी मागणी करणारे निवेदन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महसूल तंटामुक्त गाव समितीच्या वतीने राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचेकडे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, सामाजिक न्याय विभागाचे गलथान कारभारामुळे वृद्ध पेन्शन धारक, विधवा महिला, तसेच दुर्धर आजाराचे पेन्शन धारक. अशा सर्वच लाभधारकांना अतिशय त्रास सहन करावा लागत आहे. ज्या प्रमाणे दिव्यांग सशक्तीकरण विभागाचा व्यवहार नीटपणे सुरु आहे. तसाच या लाभधारक निराधारांना का नियमित लाभ मिळत नाही. या लाभधारकांना का नरक यातनागत त्रास सोसावा लागत आहे. या विषयावर मंत्री महोदय आपण लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. सर्वच पेन्शन योजनेचे लाभार्थी चिंतातूर झालेले आहे.

जुलैच्या ४ तारखेला हप्ता येतो तर कधी ऑगस्ट महिन्याचे १८ तारखेला हप्ता येतो. सप्टेंबर महिना समाप्त होत असूनही त्यात पोळा, गणेश चतुर्थी, गौरी पूजन, असे महत्त्वाचे सण असूनही पेन्शन धारकांना त्यांचे पैसे मिळत नाही. पावसाळी दुष्काळाने मजुरी मिळत नाही. महागाईने तर एवढं डोकं वर काढलंय की, यामध्ये तर भुमिहीन शेतमजुर होरपळून गेला आहे. वरील सर्व बाबींचा विचार करून या सर्व लाभ धारकांची महिन्यातली एक तारीख निश्चित करुन त्यांना आर्थिक मदत करावी. अन्यथा येत्या जि.प.व पं.स.च्या निवडणुकीत याचा परिणाम दिसून येईल. तहसील, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयासमोर या निराधारांच्या वतीने आमरण उपोषणाचा तंबु ठोकण्यात येईल, असा ईशारा सुध्दा अध्यक्ष सोपान ढोले, गणेश देशमुख, मधुकर देशमुख, सुधाकर मानकर, भावना सातपुते, उमेश बाहे, गणपत शेंडे, डॉ.नितीन वानखडे, निलिमा कुऱ्हाडे, रत्ना ढोले, शैलेश ठाकरे, संजय काबळे, आशिष आंडे, संजय कांबहे, सुनिल खेडकर, दिलीप भोयर, सुधाकर पोहणे, रामहरी बिजवे, लिलाधर गोरले, सुनिल दिघेकर, प्रकाश पाटणकर, सुनिल मानेकर, सुनिल तानवाईस, भाऊराव सुरजूसे, गुलाब अलोणे, महेंद्र सोनोने, ज्ञानेश्वर ब्राम्हणे, गिरीधर बिसांद्रे, कैलास लोणकर, शंकरराव कनिरे, मनोहर चरपे, भागवत मेश्राम, आशा विंचुरकर आदींनी केली आहे.




# अमरावतीत शिक्षक मतदारसंघात शिवसेना ठाकरे गट अन काँग्रेस आमने-सामने

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीत फूट?



**अमरावती** – अमरावतीत शिक्षक मतदारसंघात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेनंतर काँग्रेसनेही उमेदवार दिला आहे. परिणामी अमरावती शिक्षक मतदारसंघात महाविकास आघाडीमधील दोन प्रमुख पक्ष आता आमने-सामने येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विधान परिषद निवडणुकीसाठी ठाकरे गटाकडून उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. तर काँग्रेसकडून देखील उमेदवार जाहीर करण्यात आली आहे. अमरावती शिक्षक मतदारसंघातून दत्तात्रय लहाने यांना शिवसेना ठाकरे गटाची उमेदवारी जाहीर झाली आहे. तर काँग्रेसकडून अदिती ऋषिकेश पोहरे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. मुंबईत लहाने यांनी नुकतीच उद्धव ठाकरेंची भेट घेतल्यानंतर लहाने यांना उद्धव ठाकरे यांनी शब्द दिला होता. दत्तात्रय लहाने बुलढाणा जिल्ह्यातील रहिवासी असून प्राध्यापक पदावर ते कार्यरत राहिले आहेत. शिक्षकांसाठी अनेक आंदोलने त्यांच्या समस्या शासन दरबारी त्यांनी मांडले आहेत. दरम्यान, उमेदवारी मिळाल्यानंतर त्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे आभार देखील मानले. तर दुसरीकडे अमरावती शिक्षक मतदारसंघात शिवसेना ठाकरे गट व काँग्रेसच्या उमेदवारांमध्ये आमने-सामने लढत होण्याची शक्यता. ५ ऑक्टोबर रोजी लहाने हे अरविंद सावंत यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करणार असल्याची माहिती देखील शिवसेना नेत्यांनी दिली आहे. परिणामी अमरावती विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीत फूट पडलीय का? असा सवाल आता राजकीय वतुर्ळात विचारला जातोय.

# दुष्काळाचा आणखी एक बळी! अकोल्यात २६ वर्षीय युवा शेतकऱ्यानं विहिरीत स्वतःला झोकून दिलं, दुष्काळ जाहीर झाल्यानंतर सहा दिवसात चार शेतकऱ्यांनी जीवन संपवलं

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अकोला** – महाराष्ट्रात दुष्काळाची दाहकता दिवसागणिक वाढत असतानाच वाढत्या तापमानाचा थेट परिणाम आता राज्यातील मोठ्या धरणांसह इतर जलसाठ्यावर होताना दिसत आहे. तर दुसरीकडे मोठ्या मेहनतीने उभी केलेली पिकं पावसाअभावी सुकून गेल्यानं बळीराजा मोठ्या अडचणीत सापडला आहे. दरम्यान, अकोला जिल्ह्यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर सहा दिवसात शेतकऱ्याची चौथी आत्महत्या झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सुकोडा गावातील २६ वर्षीय युवा शेतकरी संतोष नेमाडे यांनी आत्महत्या करत जीवन संपवलं आहे. गावालगतच्या विहिरीत उडी मारून केली युवा शेतकरी संतोष नेमाडे यांनी आत्महत्या करत जीवन संपवलं आहे. सहा दिवसात पश्चिम विदर्भात आत्तापर्यंत जवळपास १५ पेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या आत्महत्या मिळालेल्या माहितीनुसार, पाऊस न झाल्याने शेतातील परिस्थितीमूळे सुकोडा गावातील २६ वर्षीय युवा शेतकरी संतोष नेमाडे तणावात होते. गेल्या सहा दिवसातील जिल्ह्यातील शेतकऱ्याची ही चौथी आत्महत्या असल्याने सर्वत्र मोठी खळबळ उडाली आहे. याआधी बार्शीटाकळी तालुक्यातील सिंदखेड मोरेश्वर, मुर्तीजापुर तालुक्यातील गाजीपुर, आणि तेल्हारा तालुक्यातील खापरखेड येथील तीन शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत.

# जीएसटी २ लाख कोटी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – देशांतर्गत उपभोग आणि आयातीमधून मिळालेल्या मजबूत महसुलामुळे सप्टेंबर महिन्यात एकूण जीएसटी संकलन १४.७ टक्क्यांनी वाढून २.०३ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. शासकीय आकडेवारी नुसार, देशांतर्गत व्यवहारांमधून मिळणारा जीएसटी १०.१ टक्क्यांनी वाढून १.३८ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे, तर आयातीवरील महसूल २६ टक्क्यांनी झपाट्याने वाढून ६५,५२५ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

# ग्रामसभेत प्रश्न विचारला अन माजी सरपंच संतापले, तरुणाला मारहाण केली



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जळगाव** – जळगावच्या पाचोरा तालुक्यातील जारगाव ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत धूर फवारणी यंत्राच्या मुद्द्यावरून वाद झाल्याची घटना समोर आली आहे. ग्रामसभेत एका तरुणाने धूर फवारणी यंत्राच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित केल्यानंतर वातावरण तापल्याचे सांगण्यात येत आहे. याच मुद्द्यावरून माजी सरपंच आणि संबंधित तरुणामध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. त्यानंतर माजी सरपंचाने तरुणाला मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, जारगाव ग्रामपंचायतीची ग्रामसभा सुरू असताना गावातील एका तरुणाने धूर फवारणी यंत्राच्या वापराबाबत तसेच त्याच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित केला. ग्रामसभेत नागरिकांच्या उपस्थितीत हा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर त्यावरून वाद निर्माण झाला.

# दुष्काळानं लेक न्येला... जीव तुटतुया हो...

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

## मुरूमखेड्यात आत्महत्या केलेल्या तरुण शेतकऱ्याच्या आईचा काळीज पिळवटणारा टाहो



**छत्रपती संभाजीनगर** – 'कर्ज काढून, हात उसनं घेऊन सोयाबीन पेरलं, मल्चिंगवर मिरची बी लावली, मका पीक पेरलं . मह्या पोराचा शेतीवर लय जीव, पण पेरलेल्या पिकातलं हातात काही आलं नाही, उलट दुष्काळानं माझा लेक न्येला! जिथं सोयाबीन हुतं, तिथंच लेकाला अग्नी दिला.

आता त्याची राख उडती आन त्ये बगून काळीज फाटत जातंया हो...' आत्महत्या केलेल्या एका तरुण शेतकऱ्याच्या आईने व्यक्त केलेली ही भावना काळीज पिळवटून टाकणारी आहे. त्यावरून दुष्काळाची दाहकता किती खोलवर गेली आहे, याचे भयाण वास्तव मराठवाड्यात दिसून येते. विजय गोविंदराव बचाटे यांनी २८ सप्टेंबरच्या सायंकाळी विषारी औषध पिऊन जीवन संपवले. त्यांच्या घरी, शेतात जाऊन शिवार बघितले, नी शब्दच गोठले...वाया गेलेल्या सोयाबीनच्या शेतात मृत विजय बचाटे यांच्यावर अंत्यसंस्कार केल्याचे सांगताना त्यांची आई जिजाबाई यांनी अश्रूंना वाट करून देत शेतकऱ्यांची प्रातिनिधिक व्यथाच मांडली.

१००-२०० मीटर अंतरावर मृत विजय यांना अग्नी देण्यात आला. 'उन्हाळ्यासारख्या रखरखत्या उन्हात वारा सुटला की राख उडून अंगणापर्यंत येती, तवा माझं काळीज फाटून जातं,' अशी भावना जिजाबाईंनी व्यक्त केली. विशेष म्हणजे, ज्या शेतात विजय यांना अग्नी दिला होता, त्याच शेतात सोयाबीन पेरणी केली होती.

# महाराष्ट्रात कॅबप्रमाणेच आता एका क्लिकवर मिळणार रुग्णवाहिका

**राज्य शासनाचा मोठा निर्णय**

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**बीड** – महाराष्ट्रात वैद्यकीय आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णवाहिका मिळवणे आता कॅब बुक करण्याइतके सोपे होणार आहे. राज्य परिवहन आणि आरोग्य विभागाकडून एका नाविन्यपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्मवर काम सुरू असून, याद्वारे नागरिक मोबाईल ॲप किंवा वेबसाइटच्या माध्यमातून आपल्या सर्वात जवळ उपलब्ध असलेली रुग्णवाहिका सहज शोधू आणि बुक करू शकतील. प्रणालीची प्रमुख वैशिष्ट्ये: थेट स्थान आणि माहिती: या प्रस्तावित प्लॅटफॉर्मवर रुग्णवाहिकेचे लाईव्ह लोकेशन (थेट स्थान), पोहोचण्याची अंदाजित वेळ आणि प्रवासाचे सेवा शुल्क स्पष्टपणे दाखवले जाईल.

आरोग्य आणि परिवहन विभागाचा संयुक्त उपक्रम: विविध प्रादेशिक परिवहन कार्यालयांमध्ये नोंदणीकृत असणाऱ्या सर्व रुग्णवाहिकांचे तपशील या प्रणालीशी जोडले जातील. खाजगी चालकांचा सहभाग: खाजगी रुग्णवाहिका चालक आणि रुग्णालयांनाही या डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचे नियोजन असून, त्यांच्यासाठी किमान वैद्यकीय सुविधा आणि मानके बंधनकारक केली जाऊ शकतात. अपघाताच्या 'गोल्डन अवर'वर विशेष भर रस्ते अपघाताच्या वेळी वेळेवर मदत न मिळाल्यामुळे अनेकदा जीव गमावावा लागतो. या समस्येवर मात करण्यासाठी ही यंत्रणा अपघातानंतरचा पहिला तास म्हणजेच 'गोल्डन अवर' लक्षात घेऊन विकसित केली जात आहे.




